**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सोलापुर ग्रामीण  **P.S.(ठाणे):** पंढरपूर शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0596  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 16/09/2023 00:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार  **Date From (दिनांक पासून):** 15/09/2023
**Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/09/2023
**Time From (वेळेपासून):** 15:50 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 16/09/2023  **Time (वेळ):** 00:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 16/09/2023 00:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मराविवि उप विभाग,पंढरपुर ग्रामीण 02 , कार्यालयाचे आवारात,पंढरपुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** मारुती शंकर मोरे

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** शंकर मोरे

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1997

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पटवर्धन कुरोली,पंढरपुर,पंढरपूर शहर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पटवर्धन कुरोली,पंढरपुर,पंढरपूर शहर ,सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9890164347

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीकांत भिमराव आवाड | | वडील का नाम : भिमराव आवाड | 1. सहायक लेखापाल,नेमणुक मराविवि उप विभाग,पंढरपुर ग्रामीण 02,पंढरपूर शहर , सोलापुर ग्रामीण,महाराष्ट्र,भा |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहि देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In ) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | लाच स्विकारली रक्कम 5,000/ रु | 5,00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

5,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 15/09/2023

मी श्री मारुती शंकर मोरे वय-26 वर्षे धंदा- किराणा व्यावसाय, रा.पटवर्धन कुरोली,ता. पंढरपुर, जि.सोलापुर मो.नं. 9890164347.

मी वरील प्रमाणे असुन वरील ठिकाणी परिवारासह राहणेस आहे. मी आमच्या गावामध्ये श्री उपासे यांचे मालकीच्या गाळ्यामध्ये भाडेतत्वाने किराणा मालाचे दुकान चालवित आहे. त्यांच्या नमुद गाळ्यामध्ये वीज मिटर नसल्याने मी शेजारील शेख यांचे गाळ्यामधुन लाईटचे कनेक्शन घेतले होते. मागील 10 दिवसांपुर्वी माझ्याकडे महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण-02 येथील श्रीकांत आवाड साहेब आले व मला बोलले की, तुझ्या गाळ्यातील वीज कनेक्शन हे बेकायदेशीर असुन तुला याचा 70,000/-रु दंड भरावा लागेल. असे म्हणुन माझ्या गाळ्यातील वीज कनेक्शन त्यांनी तोडले. तसेच त्यांनी मला नमुद गाळ्या करीता नवीन वीज मिटर घेण्याबाबत सांगितले. त्याबाबत मी माझे गाळा मालक श्री उपासे यांना सांगितले असता त्यांनी नवीन वीज मिटर साठी लागलीच पंढरपुर ग्रामिण-2 महावितरण कार्यालय येथे अर्ज केला होता व त्या अर्जाबाबत पाठपुरावा करुन वीज मीटर बसवुन घेणेबाबत त्यांनी मला अधिकार पत्र दिले होते. त्यानुसार मी अर्जाबाबत पाठपुरावा करणेसाठी पंढरपुर ग्रामिण-2 महावितरण कार्यालय येथे जाऊन वीज कनेक्शन तोडणारे श्रीकांत आवाड साहेब यांना भेटलो असता त्यांनी मला दंड माफ करणेसाठी व नवीन वीज मिटर कनेक्शन देणेसाठी 15,000/- रुपयांची लाच मागणी केली.

म्हणुन मी दि.14/09/2023 रोजी अँटी करप्शन ब्युरो पुणे येथील पोलीस अधीकारी श्रीमती जानवे मॅडम यांना फोन करुन माझी महावितरण विभाग पंढरपुर ग्रामिण-02 येथील श्रींकांत आवाड यांचे विरुध्द लाच मागणीची तक्रार असल्याचे सांगितले. जानवे मॅडम यांनी मला पोलीस निरीक्षक शिंदे साहेब यांचा फोन नंबर देऊन त्यांचेकडे तक्रार देण्यास सांगितले. त्यानुसार मी शिंदे साहेब यांना फोन करुन माझी तक्रार सांगितली. दि.15/09/2023 रोजी शिंदे साहेब मला त्यांच्या पथकासह पंढरपुर येथे येऊन भेटले. मी त्यांचेकडे माझी लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे-'माझे मोरे सुपर मार्केट नावाने मु.पो.पटवर्धन कुरोली येथे श्री उपासे यांच्या मालकीच्या गाळ्यामध्ये भाडेतत्वावर किराणा दुकान आहे. नमुद गाळ्यामध्ये विज कनेक्शन नसल्यामुळे मागिल दोन वर्षापासुन माझ्या दुकानाशेजारी श्री शेख यांच्या गाळ्यातुन विज कनेक्शन घेवुन मी विज वापरत होतो. 10 दिवसापुर्वी माझ्या किराणा दुकानातील शेख यांच्या गाळ्यातुन आनलेले विज कनेक्शन एमएसईबीचे अधिकारी श्रीकांत आवाड यांनी बंद करायला लावले व मला 70,000/- रुपये दंड भरण्याबाबत सांगितले. दंड भरायचा नसेल तर मला 15,000/- रुपये दे अशी मागणी केली. तसेच माझ्या नमुद किराणा दुकानाच्या गाळ्यात नविन विज कनेक्शन घेण्यासाठी श्री उपासे यांनी मागील 10 दिवसापुर्वी एमएसईबी कार्यालय पंढरपुर ग्रामिण येथे अर्ज केला आहे. त्यांनतर उपासे यांनी मला पाठपुरावा करुन सदर गाळ्यामध्ये मिटर बसवण्यास सांगितले म्हणून मी त्याबाबत एमएसईबी ऑफीस येथे जावुन आवाड साहेब यांना भेटलो असता त्यांनी पहीले कामाचे 15,000/- रुपये दिल्यानंतर याचे सांगतो असे सांगितले. त्यांनी मागितलेले 15,000/- रुपये लाच असल्याची माझी खात्री आहे. मला त्यांना लाच देण्याची इच्छा नाही. तरी आपल्या विभागामार्फत योग्य ती कारवाई करावी ही विनंती. माझा व श्रीकांत आवाड यांचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही अगर आमच्यात कोणतेही पुर्व वैमनस्य नाही.'

तक्रार दिल्यानंतर लगेच पोलीस निरीक्षक शिंदे साहेब यांनी त्यांचेसोबत उपलब्ध असलेल्या शासकीय पंच पंचाची व सोबतच्या स्टाफची माझ्याशी ओळख करुन दिली. तसेच शिंदे साहेबांनी पडताळणी कारवाईबाबत व व्हाईस रेकॉर्डरबाबत मला माहीती दिली. माझ्या तक्रारीचे पडताळणी करण्यासाठी माझे सोबत व्हॉईस रेकॉर्डर देवून शासकीय पंच श्री वैभव प्रकाश नाळे यांचेसह मला श्री.श्रीकांत आवाड यांना भेटण्यासाठी महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण-02 येथे पाठविले. तेथे गेल्यानंतर माझी व श्री आवाड यांची भेट होऊन माझ्या कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी चर्चे दरम्यान

पुरवणी पा.क्र.1 फिर्यादी श्री.मारुती मोरे यांचे दि. 15/09/2023 रोजी फिर्यादी जबाबा लगतचे

श्री. आवाड यांनी माझ्याकडे वीज मिटर कनेक्शन देणेसाठी व 70,000/- रुपयांचा दंड माफ करतो असे सांगुन 05,000/- (पाच हजार) रुपयांची मागणी करुन ती रक्कम तात्काळ घेऊन येण्यास सांगितले. म्हणुन आम्ही शिंदे साहेब व पथक थांबले येथे निघुन आलो. श्री.आवाड यांनी 05,000/- रु घेऊन बोलाविले असल्याने त्याप्रमाणे मी माझ्या बचतीतील सोबत घेऊन आणलेली रक्कम 05,000/- (पाच हजार) रुपये शिंदे साहेब यांच्याकडे दिली. त्य रकमेला अँथ्रासीन पावडर लावून ती रक्कम माझ्याकडे परत दिली. शिंदे साहेब यांनी मला पुढील कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. माझ्यासोबत व्हॉईस रेकॉर्डर आणि पंच यांना सोबत देवून मला श्री.आवाड यांना भेटण्यासाठी महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण -02 येथील कार्यालयात पाठविले. आम्ही श्री आवाड यांना भेटण्यासाठी महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण -02 येथे गेलो. माझे पाठोपाठ शिंदे साहेब व त्यांच्या पथकाचे लोक महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण -02 च्या आवारात थांबून राहिले. मी व पंच श्री नाळे यांनी कार्यालयाच्या आवारात जाऊन श्री आवाड यांची भेट घेतली द सांगितले की, 'तुम्ही सांगितले प्रमाणे मी पाच हजार रुपये घेऊन आलो आहे." त्यानंतर त्यांनी ती रक्कम माझ्याकडुन स्विकारुन त्यांच्या पँटच्या खिशात ठेवल्यानंतर मी सापळा पथकास माझ्या खिशातील चष्मा डोळ्यावर लावुन पुर्वनियोजित इशारा केला. सापळा पथकाने लगेचच श्री.आवाड यांना दि. 15/09/2023 रोजी दुपारी 03.50 वाजतच्या सुमारास ताब्यात घेतले. शिंदे साहेब यांनी श्री. आवाड यांना त्यांचे नाव, पत्ता, पद विचारले.

तरी नविन वीज मिटर कनेक्शन देण्यासाठी व 70,000/-रुपयांचा दंड आहे असे सांगुन तो दंड माफ करण्यासाठी महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण-02 येथील श्री. श्रीकांत भिमराव आवाड यांनी दि. 15/09/2023 रोजी माझ्याकडे तडजोडी अंती 05,000/- (पाच हजार) रुपयांची लाचेची मागणी करुन ती लाच रक्कम दुपारी 03.50 वा. चे सुमारास महावितरण कार्यालय पंढरपुर ग्रामिण -02 च्या आवारात स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मी वाचून पाहीली असून माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष- हे लिहुन दिले

श्रीराम विष्णु शिंदे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

ARUN DNYANADEV FUGE(I (Inspector)) / PBMH72674 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15 **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पंढरपूर शहर

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** ARUN DNYANADEV I

**Rank(पद):** I (Inspector)

**No.(सं.):** PBMH72674